CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०८.०९.२०२६ | अंक नं. १३६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹ 50000/- सोने खरेदीवर
₹ 20000/- चांदी खरेदीवर
₹ 5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹ 5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
पाहिजेत
सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
कॅशियर जागा : 2 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 20000/- ते 21000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह सोमवार ते शनिवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.

# डीएसपी चौकातील उड्डाणपुलाचा मार्ग मोकळा

## वाहतूक कोंडीतून मिळणार कायमस्वरुपी दिलासा; पालकमंत्री विखे पाटील व आ.संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

नगर - अहिल्यानगर शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या डीएसपी चौकातील कोंडीचा प्रश्न आता कायमस्वरूपी मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. शहराच्या वाढत्या वाहतुकीचा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून डीएसपी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या कामाला गती मिळाली असून, या प्रकल्पासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने तसेच आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण प्रकल्प पुढे आला आहे.

कोपरगाव-शिर्डी-कोल्हार-अहिल्यानगर या प्रमुख मार्गावरील डीएसपी चौक हा शहरातील वाहतुकीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. संभाजीनगरकडून येणारी वाहने तसेच शिर्डी, कोपरगाव, कोल्हार आणि शहराच्या विविध भागांकडे जाणारी वाहतूक या चौकातून मोठ्या प्रमाणावर होते. वाढत्या वाहनसंख्येमुळे विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत या ठिकाणी मोठी कोंडी होत होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने काही मिनिटांचा प्रवास पूर्ण करण्यासाठी नागरिकांना बराच वेळ वाहतुकीत अडकून राहावे लागत होते. परिणामी, वेळ आणि इंधनाचा अपव्यय होण्याबरोबरच रोजच्या प्रवासाचा ताणही वाढत होता.



शहराच्या दैनंदिन वाहतुकीशी निगडित हा प्रश्न लक्षात घेऊन डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीवर कायम स्वरूपी उपाय करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता भविष्यातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारण्याची गरज त्यांनी मांडली. त्यांच्या पाठपुराव्याला पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

डीएसपी चौकातील प्रस्तावित उड्डाणपुलासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या प्रकल्पाला आता प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली आहे.

उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर डीएसपी चौकातील मुख्य वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. शिर्डी, कोपरगाव, कोल्हार तसेच अहिल्यानगर शहराच्या विविध भागांकडे जाणाऱ्या वाहनांना अधिक सुरळीत मार्ग उपलब्ध होईल. परिणामी, चौकातील कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे.

डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीचा परिणाम केवळ वाहनांच्या रांगांपुरता मर्यादित नव्हता. या कोंडीत अडकणाऱ्या नागरिकांचा वेळ, इंधन आणि श्रम खर्ची पडत होते. कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्णवाहिका तसेच शहराबाहेर प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा दररोज सामना करावा लागत होता. त्यामुळे उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर अहिल्यानगरकरांच्या रोजच्या प्रवासातील वेळ आणि त्रास कमी होणे हा या प्रकल्पाचा सर्वात मोठा परिणाम ठरणार आहे.

अहिल्यानगर शहराचा विस्तार वेगाने होत असून, वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि शहराला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवरील वाहतूक लक्षात घेता भविष्यातील गरजांसाठी पायाभूत सुविधा सक्षम करणे आवश्यक झाले आहे. त्या दृष्टीने डीएसपी चौकातील उड्डाणपूल हा केवळ सध्याची वाहतूक कोंडी कमी करणारा प्रकल्प नसून, अहिल्यानगर शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या वाहतूक व्यवस्थेचा विचार करून उचललेले महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

वर्षानुवर्षे डीएसपी चौकातील कोंडीचा त्रास सहन करणाऱ्या नागरिकांसाठी उड्डाणपुलाच्या मंजुरीमुळे आता मोठा दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून, आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती मिळाली आहे.

अहिल्यानगर शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार, अशी भावना डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली. शहराच्या वाढत्या गरजा आणि भविष्यातील वाहतुकीचा विचार करून शासनाने घेतलेला हा निर्णय अहिल्यानगरच्या विकासाला अधिक गती देणारा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## सोने चांदीच्या दरात चढ उतार कायम

नवी दिल्ली - भारतातील वायदा बाजारात एमसीएक्सवर ८ सप्टेंबर रोजी सकाळी सोन्याच्या फ्युचर्स किमतींनी १.५३ लाख रुपये तर, चांदीचा वायदा दर २.४० लाख रुपयांवर वाढीसह व्यवहार सुरू केले. त्याचवेळी, ८ सप्टेंबर रोजी देशांतर्गत सराफा बाजारात २४, २२ आणि १८ कॅरेट सोन्याचे तर चांदीचा भाव स्थिर राहिला आहे. सोन्याचा भाव किंचित घसरून १,५४,१४० रुपये १० ग्रॅम झाला, तर चांदीचा भाव आता २,४९,९०० रुपये किलोवर पोहोचला आहे.

दुसरीकडे आंतरराष्ट्रीय बाजारात अपेक्षेपेक्षा अधिक मजबूत अमेरिकन रोजगार आकडेवारी आणि सप्टेंबरमध्ये फेडच्या व्याज दरवाढीच्या कमी झालेल्या अपेक्षेमुळे कॉमेक्स वर सोन्याचा वायदा भाव मागील बंद भावापेक्षा ०.१७% घसरून ४,४४६ औंसवर किंचित स्थिर राहिला. तसेच कॉमेक्सवरील चांदीचा भाव ०.८३% वाढून ६७.३० औंसवर पोहोचला.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरूमकरिता
सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा :
कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

WANTED
नर्सिंग स्कूलसाठी
अ.नगरमध्ये
अकौंटंट (टॅली प्राईम)
क्लर्क (अनुभवी)
ट्युटर (B. Sc. Nursing)
9604672246

# उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर सोर्स कोड चोरीचा मास्टरमाईंड दुबईला पळाला

## भारतात परतताच विमानतळावरच सायबर पोलिसांनी ठोकल्या बेड्या, १५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

नगर - पुण्यातील नामांकित आयटी कंपनीच्या सॉफ्टवेअरचा गोपनीय सोर्स कोड चोरी करून बाहेर पाठवल्याच्या गंभीर प्रकरणात अहिल्यानगर सायबर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर थेट दुबईला पलायन केलेल्या संशयित आरोपीला अखेर पुणे विमानतळावरच बेड्या ठोकण्यात आल्या. मंदार प्रदीप पाथरीकर (वय ३३, रा. नवी पेठ, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पाथरीकर याच्याविरोधात लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली होती. दुबईहून तो पुणे विमानतळावर दाखल होताच अहिल्यानगर सायबर पोलिसांनी त्याला ताब्यात घेत अटक केली. ७ सप्टेंबर रोजी आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १५ सप्टेंबरपर्यंत आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी या कारवाईची माहिती दिली.या प्रकरणामुळे आयटी क्षेत्रातील गोपनीय डेटा आणि सॉफ्टवेअर सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या प्रकरणी नितीन गोपालदास भराडीया (वय ४२, रा. पुणे) यांनी मार्च २०२६ मध्ये अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र फिर्यादी दाखल केल्या होत्या. त्यावरून दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यापैकी एका गुन्ह्यात पाथरीकर याला अटक करण्यात आली आहे. भराडीया हे पीआरएम सॉफ्ट सोल्युशन प्रा. लि. कंपनीत प्रमुख धोरण अधिकारी (सीएसओ) म्हणून कार्यरत आहेत. ही कंपनी महाराष्ट्र *(पुढील मजकूर पान २ वर)*

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य, आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
पुरुषांसाठी | महिलांसाठी | मुलांसाठी
उपलब्ध नामांकित ब्रँड्स
adidas NIKE PUMA Reebok SKECHERS asics campus sparx ABROS Bata RELAXO Paragon crocs KOLHAPURI मोजडी
आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या ! एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर, मो : 9881531536

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दि. : ०४ ते १० सप्टेंबर २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
टॉक्सिक (हिंदी) SCREEN - 1
03.00 PM 150/-
मिर्झापूर 09.00 PM 200/-
हनुमान अंश 06.30 PM 150/-
द्विधा 12.00 PM 100/-
SCREEN - 2
मिर्झापूर
10.00 PM 100/- 06.00 PM 200/-
02.00 PM 150/- 10.00 PM 200/-
आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 04 ते 10 सप्टेंबर 2026
हनुमान अंश (हिंदी) 08:00 AM 07:15 PM 11:00 AM 07:30 PM 12:30 PM 10:15 PM 02:00 PM
टॉक्सिक 08:30 AM 03:30 AM 10:15 PM
मिर्झापूर 03:15 PM 08:00 AM 06:00 PM 10:00 AM 06:50 PM 11:35 PM 09:45 PM 02:15 PM 10:30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

प्रथम पुण्यस्मरण

स्व. सुरेश छगनमल गुंदेचा
जन्म : १०/१२/१९५४ • स्वर्गवास : ०९/०९/२०२५
तुमचं असणं सर्व काही होतं, आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं,
आज सर्वकाही असल्याची जाणीव आहे, पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे.
* शोकाकुल *
श्रीमती गीता सुरेश गुंदेचा
सौ.सोनल पवन गुंदेचा
सौ.पूनम आनंदजी गांधी (नवी सांगवी)
सौ.सपना सुशीलजी चुत्तर (छत्रपती संभाजीनगर)
चि. तेजस गुंदेचा, चेतक गुंदेचा, कु. मनाली गांधी, करण गांधी, स्वराज चुत्तर
मे. पवन घी डेपो
बुरुडगल्ली, अहिल्यानगर. मो. ९९६००२१३१३

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# संस्कार भारती तर्फे १२ सप्टेंबर रोजी 'कथाकथी २६' कार्यशाळेचे आयोजन

नगर – मराठी साहित्यातील ज्येष्ठ साहित्यिक शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर आणि द. मा. मिरासदार यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून संस्कार भारती, अहिल्यानगर समिती यांच्या वतीने कथाकथन कार्यशाळा १२ सप्टेंबर रोजी दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेत आयोजित करण्यात आहे,अशी माहिती अहिल्यानगर समिती सचिव सौ. स्नेहल झांबरे यांनी दिली.

आयुर्वेद व्यासपीठ,धर्माधिकारी मळा, सावेडी,अहिल्यानगर येथे या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून प्रसिद्ध कथाकार श्री.कौस्तुभ केळकर (नगरवाला) मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेमध्ये कथेची योग्य निवड, वेळेचे नियोजन, देहबोली, भाषा आणि प्रेक्षकांशी प्रभावी संवाद कसा साधावा याचे मार्गदर्शन केले जाईल.तसेच प्रशिक्षणार्थींना कथाकथन आणि अभिवाचन यातील सूक्ष्म फरक समजून घेण्याची आणि आपल्या कलागुणांना वाव देण्याची संधी मिळेल. या कार्यशाळेच्या पाठोपाठ संस्कार भारतीतर्फे लवकरच एका जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेचेही आयोजन करण्यात येणार आहे असे उपक्रम प्रमुख श्री. तेजस अतीतकर यांनी सांगितले.

नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी तेजस अतितकर–८६००००७९९७, तन्मयी भावे –९८६०००५२००, रघुनाथ सातपुते–९८८१४७२५०७ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अहिल्यानगरच्या विकास आराखड्यात भूखंड आरक्षणांवरून 'दलाली'चा संशय

## ठाकरे शिवसेनेची नगर विकासकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी



नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या ३० जुलै रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. २३ अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करण्यास मंजुरी देण्यात आली. मात्र, संपूर्ण प्रारूप विकास योजना, अधिकृत नकाशे, तांत्रिक अहवाल आणि आवश्यक अभिलेख सभागृहा समोर उपलब्ध न करून देता हा निर्णय घेण्यात आला. बंद दारा आड सभा घेतली गेली. सुमारे ३८ दिवस उलटूनही प्रारूप आराखडा जनतेसाठी जाणीवपूर्वक जाहीर केला गेला नाही, असे अनेक गंभीर आरोप ठाकरे शिवसेनेने केले आहेत. विकास आराखड्यात भूखंड आरक्षणांवरून 'दलाली'चा संशय व्यक्त करत महानगर प्रमुख किरण काळे यांनी मोठ्या सौदेबाजीला पेव फुटले असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरिय चौकशी करण्याची मागणी करत नगर विकासच्या प्रधान सचिवांकडे काळे यांनी तक्रार केली आहे.

काळे यांनी तक्रारीत म्हटले आहे की, प्रारूप विकास योजना ही शहराच्या भविष्यातील विकासाशी थेट संबंधित असून जमीन वापर, निवासी व व्यावसायिक क्षेत्रे, सार्वजनिक आरक्षणे, रस्ते, रस्ता रुंदीकरण, उद्याने, शाळा, रुग्णालये, बाजारपेठा, नदी–नाले आणि पर्यावरणासह नागरिकांच्या मालमत्ता हक्कांवरही तिचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अशा महत्त्वपूर्ण योजनेबाबत संपूर्ण पारदर्शकता आवश्यक असल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

### आरक्षणाच्या नावाखाली सौदेबाजी

दरम्यान, प्रारूप विकास योजना अधिकृतरीत्या प्रसिद्ध होण्यापूर्वीच काही व्यक्तींकडून नागरिकांना व भूखंडधारकांना त्यांच्या मालमत्तेवरील आरक्षण बदलून देणे, वगळून देणे अथवा अनुकूल जमीन वापर करून देण्याची आश्वासने दिली जात असल्याच्या चर्चा सुरू असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. आरक्षणाच्या नावाखाली सत्ताधारी हे अधिकाऱ्यांशी संगनमत करून सौदेबाजी करत असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे.

### सौदेबाजीला बळी पडू नका

किरण काळे यांनी शिवसेनेच्या वतीने शहरातील भूखंड धारकांना जाहीर आवाहन केले आहे की तुमच्या भूखंडावर आरक्षण टाकतो किंवा काढून देतो यासाठी जर भूखंड माफियांचे एजंट तुम्हाला वेठीस धरायचा प्रयत्न करत असतील तर त्याला बळी पडू नका. घाबरू नका. जोपर्यंत प्रत्यक्ष प्रारूप आराखडा जनतेसाठी जाहीर होत नाही तोपर्यंत वाट पहा. कुणाच्याही सौदेबाजीला बळी पडू नका, असे आवाहन त्यांनी केले आहे.

आयुक्तांसह संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करा

या प्रकरणात आयुक्त यशवंत डांगे, नगररचनाच्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची वरिष्ठ स्तरावरून प्रशासकीय चौकशी करण्याची प्रमुख मागणी ठाकरे शिवसेनेने केली आहे. किरण काळे यांनी स्पष्ट केले की, प्रारूप विकास योजनेला आमचा तत्त्वतः विरोध नसून, तिच्या मंजुरीच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि नागरिकांच्या हिताचे संरक्षण झाले पाहिजे, हीच भूमिका आहे. योजना सार्वजनिक करून नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यात याव्यात आणि त्यानंतरच पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दहा दिवसांच्या आत प्रारूप आराखडा जनतेसाठी जाहीर करा, अन्यथा ठाकरे शिवसेना आक्रमक पवित्रा घेईल असा इशारा काळेंनी दिला आहे. वेळप्रसंगी तीव्र आंदोलन अथवा उपोषणाचे संविधानिक अस्त्र उपसले जाईल, असे त्यांनी सांगितले आहे.

# वीर गोगादेव जन्मोत्सव मिरवणुकीत वीज खंडित झाल्याने हिंदू समाज संतप्त


महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुभाष घाटोळ यांना निवेदन देताना विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी.

नगर – भगवान श्री वीर गोगादेव यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित मिरवणुकीप्रसंगी सायंकाळी ७ ते १०.३० या कालावधीमध्ये वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या असून, हिंदू समाजाच्या वतीने तीव्र संतप्त व्यक्त केला जात आहे.

या मिरवणुकीत मोठ्या संख्येने हिंदू समाज एकत्रित येत असतो. तसेच महिला व माता–भगिनींचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. वीज पुरवठा खंडित झाल्याने ही मिरवणूक अंधाराच्या छायेखाली पार पडली. हिंदू सण उत्सवाच्या काळात धार्मिक मिरवणुका प्रसंगी महावितरण विभागाने वीज पुरवठा खंडित करू नये, अशी मागणी वीज महामंडळाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुभाष घाटोळ यांना निवेदनाद्वारे देण्यात आली. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे अर्चक, पुरोहित, आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, सहप्रमुख हरिभाऊ डोळसे, मनोहर भाकरे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर उपस्थित होते. तसेच येणारा गणेशोत्सव बारा दिवस असल्याने मोठ्या प्रमाणात धार्मिक पूजा–विधी व सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. या कालावधीमध्ये श्री गणेशाच्या आगमनाच्या दिवशी शहरात मोठ्या प्रमाणात मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते. तसेच गणेश भक्तांसाठी समाज प्रबोधनपर आराशीचे आयोजनही करण्यात येते. या कालावधीमध्ये वीज महामंडळाने भारनियमन व वीज पुरवठा खंडित करू नये, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर–पुरोहित आयामाच्या वतीने करण्यात आली आहे. हिंदू सण उत्सवाच्या काळात वीज पुरवठा खंडित केल्यास तमाम हिंदू समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# अहिल्यानगरमध्ये ११ सप्टेंबर रोजी मुख्याध्यापकांचे चर्चासत्राचे आयोजन

नगर – ११ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अमरज्योत मंगल कार्यालय, नगर–कल्याण रोड बायपास जवळ, अहिल्यानगर येथे मुख्याध्यापक संघाचे एक दिवसीय शैक्षणिक चर्चासत्र आयोजित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी दिली.

शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, नवोपक्रमशील शिक्षकांचे कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, तसेच शिक्षण क्षेत्रातील बदलत्या प्रवाहावर विचारमंथन करण्याच्या उद्देशाने ज्ञान कलश विशेषांकाचे या चर्चासत्रामध्ये प्रकाशन करण्यात येणार असून, या चर्चासत्रासाठी आमदार संग्राम जगताप, आ. डॉ. सत्यजित तांबे, उपमहापौर धनंजय जाधव, महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सिचन्द्र प्रताप सिंह, शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, राज्याचे सहसंचालक रमाकांत काटमोरे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय अध्यक्ष औदुंबर उकिर्डे, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बी. जे. पाटील, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, माजी शिक्षणाधिकारी दिलीपराव थोरे, पांडुरंग मगर आदी अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या चर्चासत्रात शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढ, विद्यार्थी केंद्रीय शिक्षण, शैक्षणिक नवोपक्रम, तंत्रज्ञानाचा प्रभाव, शिक्षकांची भूमिका, पालक व समाजाचा शिक्षणातील सहभाग आदी विविध विषयांवर मान्यवरांच्या उपस्थितीत सखोल विचारमंथन होणार आहे.

तसेच जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापकांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापक, प्राचार्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष सुनील पंडित, सरचिटणीस मिथुन डोंगरे, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र वाघ, आबासाहेब गर्दे, बाळासाहेब जंगले, बाळासाहेब वाघ, प्रकाश देशमुख, बालाजी गायकवाड, संघटन मंत्री संजय लहारे, कार्यालय मंत्री मंगेश जाधव, राज्य एज्युकेशन जनरलचे सहसंपादक सुनील भोर, खजिनदार एम. बी. राऊत, नगर तालुका अध्यक्ष यशवंत भुतकर, सचिव संभाजी पवार, दत्तात्रय काळे, विद्या सचिव सुनील धुमाळ, श्रीकृष्ण पवार, महानगर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव बेरड, सचिव शिवाजीराव घाडगे, शितल बांगर, संगीता तांबे, सुनील सुसरे आदींनी केले आहे.

# दिवाळीपूर्वी महापालिका कर्मचाऱ्यांना ११ हजार २५० रुपयांचे सानुग्रह अनुदान

## संपाच्या नोटीसीनंतर मनपा प्रशासन आणि युनियनमध्ये सकारात्मक चर्चा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेतील कामगार–कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी एक रकमी ११ हजार २५० सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगार–कर्मचाऱ्यांना बोनस व सानुग्रह अनुदान मिळावे, या मागणीसाठी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने ७ ऑगस्ट २०२६ रोजी महानगरपालिका आयुक्तांना संपाची नोटीस देण्यात आली होती.

या नोटीसीतील मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी युनियनच्या शिष्टमंडळासोबत बैठकीचे आयोजन केले. या बैठकीमध्ये युनियनने केलेल्या नोटीसीतील सर्व मागण्यांबाबत सविस्तर साधक–बाधक चर्चा करण्यात आली.

या चर्चेनंतर महानगरपालिकेतील पात्र कामगार–कर्मचाऱ्यांना दिवाळी सणाच्या ८ दिवस अगोदर ११ हजार २५० रुपयांची रक्कम एकरकमी अदा करण्याबाबत उभयपक्षी अंतिम निर्णय घेण्यात आला. तसेच कामगारांच्या इतर मागण्यांबाबतही बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यासोबतच कामगारांना देण्यात येणारा सणअग्रीम दिवाळीपूर्वी १५ दिवस अगोदर अदा करण्याबाबत देखील चर्चा करण्यात आली. कामगारांची थकित देणी देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. वसुली तसेच इतर मार्गाने पैसे उपलब्ध होतील, त्याप्रमाणे कामगारांची थकित देणी अदा केली जातील, असे बैठकीमध्ये ठरविण्यात आले.

या संयुक्त बैठकीमध्ये युनियनच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र सारसर, सरचिटणीस आनंदराव वायकर, बाबासाहेब मुदगल, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, बलराज गायकवाड, विठ्ठल उमाप, महादेव कोतकर, बाबासाहेब राशिनकर, उपाध्यक्ष राहुल साबळे, अमोल लहारे, बाळासाहेब व्यापारी, विजय कोतकर, ओंकार कराळे आदी उपस्थित होते.

महापालिकेच्यावतीने आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त मेहेर लहारे, आस्थापना प्रमुख गणेश लयचेट्टी यांच्या उपस्थितीत कामगारांच्या मागण्यांबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला. बैठकीमध्ये युनियनच्या वतीने सरचिटणीस आनंदराव वायकर यांनी कामगारांना सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा निर्णय लवकर घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल आ. संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, सर्व नगरसेवक, नगरसेविका तसेच महानगरपालिकेतील अधिकारी यांचे युनियनच्या वतीने आभार मानण्यात आले.

# सरकारचे शिष्टमंडळ आता जरांगे पाटलांकडे जाणार नाही

## १२ सप्टेंबरच्या अल्टिमेटमवर मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांची रोखठोक भूमिका





मुंबई – मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा तापले असताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी १२ सप्टेंबरपासून मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मात्र, सरकारने आतापर्यंत आवश्यक ते निर्णय घेतले असून अनेक मागण्यांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे आता जरांगे पाटील यांनी सरकारच्या भूमिकेला प्रतिसाद देत आंदोलन स्थगित करण्याचा विचार करावा, असे विखे पाटील यांनी म्हटले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना विखे पाटील यांनी मराठा आरक्षणासंदर्भातील निर्णय, ५८ लाख नोंदींचा मुद्दा, कुणबी प्रमाणपत्रांसाठी सुरू असलेली प्रक्रिया आणि सरकारच्या पुढाकाराची माहिती दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजासाठी यापूर्वीच्या सरकारांच्या तुलनेत मोठे निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला.

### आता जरांगे यांनी विचार करावा

मराठा आरक्षणाच्या मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकीत सध्याच्या परिस्थितीचा आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आल्याचे राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. मनोज जरांगे पाटील अद्याप आंदोलन मागे घेण्यास तयार नसल्याचे लक्षात आणून दिल्यावर विखे पाटील म्हणाले की, सरकारने मराठा समाजाच्या व्यापक हितासाठी आवश्यक ते निर्णय घेतले आहेत. या निर्णयांची अंमलबजावणीही सुरू आहे. जरांगे पाटील यांचे आणखी काही प्रश्न किंवा अपेक्षा असतील तर त्यावरही सरकारकडून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, सरकारच्या निर्णयांनंतरही जरांगे पाटील समाधानी नसतील, तर त्यांचे समाधान करण्यासाठी सरकारकडे यापेक्षा वेगळा कोणता पर्याय उपलब्ध आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### ५८ लाख नोंदींचा मुद्दा; ग्रामपंचायतींमध्ये माहिती प्रसिद्ध

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा–कुणबी नोंदींचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला आहे. यावर बोलताना विखे पाटील यांनी ५८ लाख नोंदींची माहिती ग्रामपंचायती स्तरावर उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगितले. या नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रदर्शित करण्यात आल्या असून १० सप्टेंबरपासून १७ सप्टेंबरपर्यंत संबंधित ठिकाणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. ज्यांना नोंदी किंवा प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी आहेत, त्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले होते. मात्र, या आवाहनाला अपेक्षेइतका प्रतिसाद मिळालेला नसल्याचा दावा विखे पाटील यांनी केला

मराठा आंदोलनाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाणीवपूर्वक बदनाम केले जात असल्याचा आरोप होत असल्याबाबतही विखे पाटील यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर त्यांनी दोन्ही नेत्यांची पाठराखण केली. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीच्या अनेक नेत्यांच्या तुलनेत मोठे निर्णय घेतले आणि पुढाकार घेतला असल्याचा दावा त्यांनी केला. जे नेते मराठा समाजासाठी निर्णय घेत आहेत, त्यांच्याबद्दल अपशब्द वापरणे समाजालाही मान्य होणार नाही, असे विखे पाटील म्हणाले.

### विखे पाटलांच्या भूमिकेवर मनोज जरांगे संतापले, म्हणाले– आता सुट्टी नाही, त्यांनी मराठ्यांचे वाटोळे केले

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा ८ सप्टेंबर रोजी ११वा दिवस आहे. सरकारचे शिष्टमंडळ भेटून गेल्यानंतर मागण्यांबाबत आश्वासन मिळाले होते. मात्र, त्यानंतर ठोस कार्यवाही होत नसल्याने जरांगे यांनी दोन दिवसांपूर्वी पाणी आणि उपचार घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे आंदोलनस्थळी उपस्थित मराठा समाजबांधवांमध्ये त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता वाढली आहे.

### मध्यरात्री प्रकृती खालावली

दरम्यान, काल रात्री मध्यरात्री मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती आणखी खालावल्याची माहिती समोर आली. त्यांचे वजन कमी झाले असून शुगर आणि रक्तदाबही कमी झाल्याचे सांगण्यात आले. रात्री अडीच वाजता त्यांच्या प्रकृतीची तपासणी करण्यात आली. यानंतर ही माहिती सरकारमधील मंत्र्यांना देण्यात आली.

प्रकृती खालावल्याची माहिती मिळाल्यानंतर मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी जरांगे पाटील यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. सकाळपासून मागण्यांबाबत कार्यवाही सुरू करण्याचे आश्वासन दिल्यानंतर जरांगे यांनी सलाईन घेण्यास मान्यता दिल्याची माहिती आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सोडणार नसल्याची भूमिका पुन्हा स्पष्ट केली आहे. सरकारकडून आता प्रत्यक्षात कोणती पावले उचलली जातात, याकडे आंदोलनस्थळी उपस्थित मराठा समाजाचे लक्ष लागले आहे.

# राजेंद्र बोरा यांचे संथाराव्रतात निधन



नगर – भवानीनगर अहिल्यानगर येथील रहिवासी राजेंद्र सुरजमल बोरा (वय ६०) यांचे ७ सप्टेंबर रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ८ सप्टेंबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बर्डे गल्ली येथील रसना मिसळवालेचे ते संचालक होत. सौ. वर्षा सुराणा व सुबोध यांचे वडील तर विजयकुमार बोरा यांचे ते मोठे बंधू होत.

# सोर्स कोड चोरीचा मास्टरमाईंड दुबईला पळाला

(पान १ वरुन)

शासनाच्या विविध विभागांसाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्याचे काम करते.

ग्रामविकास विभागासाठी कंपनीने बँक ऑफ महाराष्ट्रच्या सहकार्याने २०२४ मध्ये एकात्मिक एकल पोर्टल (एसयूपी) ही महत्त्वाची संगणकीय प्रणाली विकसित केली होती. ही प्रणाली १ एप्रिल २०२५ पासून अधिकृतपणे कार्यान्वित झाली होती.मात्र, कंपनीचे कामाचे देयक प्रलंबित राहणे आणि बँकेकडून करार पूर्ण करण्यात झालेल्या विलंबामुळे कंपनीने एप्रिल २०२५ मध्ये एसयूपी प्रणालीची सेवा बंद केली. त्यानंतर बँकेकडून या प्रणालीचा सोर्स कोड मागण्यात आला. मात्र, त्यासाठी कोणताही औपचारिक करार नसल्याचे सांगत कंपनीने सोर्स कोड देण्यास नकार दिला.

ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या एका व्हिडिओ कॉन्फरन्सदरम्यान बँकेकडून सादर करण्यात आलेली प्रणाली ही कंपनीने विकसित केलेल्या एसयूपी प्रणालीशी साधर्म्य असलेली असल्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर कंपनीने तातडीने अंतर्गत तपास सुरू केला.या तपासात धक्कादायक बाबी समोर आल्याचा पोलिसांचा दावा आहे. काही माजी कर्मचाऱ्यांनी कंपनीचा अत्यंत गोपनीय डेटा अनधिकृतपणे क्लाउड प्लॅटफॉर्म, ई–मेल आणि बाह्य हार्डडिस्कच्या माध्यमातून हस्तांतरित केल्याचे तपासात आढळले.इतकेच नव्हे, तर विविध डिजिटल माध्यमांचा वापर करून सॉफ्टवेअरचा सोर्स कोड कंपनीबाहेर पाठविण्यात आल्याचेही समोर आले. त्यानंतर अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात मंदार पाथरीकर याच्यासह शैला केदार (नवी पेठ, पुणे), मुकुंद दायमा (हिंजेवाडी, पुणे), जालींदर गमे (काळेवाडी रहाटे, अहिल्यानगर), योगेश चव्हाण (पिंपरी–चिंचवड) आणि चैतन्य दिलीप जोशी (सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे. आता पाथरीकरच्या पोलीस कोठडीमुळे या प्रकरणातील तपासाला वेग येण्याची शक्यता आहे. सोर्स कोड नेमका कोणाच्या माध्यमातून बाहेर गेला? चोरी केलेल्या डेटाचा वापर कुठे आणि कशासाठी झाला? हा डेटा अथवा कोड अन्य कोणाला देण्यात आला का? तसेच या संपूर्ण प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सायबर पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर पाथरीकर दुबईला रवाना झाला होता. त्यानंतर त्याच्याविरोधात लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली. अखेर तो भारतात परतताच पुणे विमानतळावरच सायबर पोलिसांनी त्याला गाठले आणि ताब्यात घेतले. त्यामुळे सोर्स कोड चोरीप्रकरणातील तपासाला आता निर्णायक वळण मिळाले आहे.


शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी माध्यमिक शिक्षक सोसायटीला सदिच्छा भेट दिली.

# शिक्षक सोसायटीला आमदार किशोर दराडे यांची भेट

नगर – अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीला शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी भेट देऊन संस्थेच्या सुरू असलेल्या कार्याची पाहणी केली. संस्थेच्या कामकाजाचे कौतुक करत त्यांनी नूतन चेअरमन बाबासाहेब बोडखे यांचा सत्कार केला.

यावेळी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, संभाजी पाटील, माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, सुनील पंडित, महेंद्र हिंगे, दिलीप काटे, वैभव सांगळे, अशोक आव्हाड, सुनील भोर, सचिन झगडे, अमोल ठाणगे, रवींद्र देवडे, राजेंद्र डमाळे, रवींद्र गावडे, तौसीफ शेख, सुधाकर सुंबे, आमदार किशोर दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे, संभाजी थोरात आदी उपस्थित होते. प्रास्ताविक करताना महेंद्र हिंगे यांनी माध्यमिक शिक्षक सोसायटीमध्ये परिवर्तन मंडळाची सत्ता आल्यानंतर सभासद हिताला केंद्रस्थानी ठेवून काटकसरीने कामकाज सुरू करण्यात आल्याचे सांगितले. संस्थेवरील सर्व वाढीव खर्चांना फाटा देऊन अनावश्यक खर्च कमी करण्याच्या दिशेने पावले उचलण्यात आली आहेत. तसेच संस्था स्वभांडवली करण्यासाठी वाटचाल सुरू असून, या उपक्रमाला सर्व सभासदांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती त्यांनी दिली.

चेअरमन बाबासाहेब बोडखे यांनी संस्थेच्या आर्थिक वाटचालीची माहिती दिली.



सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयात आंतरशालेय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धा, संस्कृत स्तोत्र पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देवून गौरविण्यात आले.

# श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनमध्ये विविध स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांच्या कलेला संधी

नगर – आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शैक्षणिक बुद्धिमत्तेबरोबरच आपले विचार उत्कृष्ट पद्धतीने दुसऱ्यांसमोर मांडणे ही एक कला आहे, हे लक्षात घेऊन श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयात आंतरशालेय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धा, संस्कृत स्तोत्र पाठांतर स्पर्धा व उत्पादन विकसितता या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. कुंदा हळबे होत्या तर अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत होते. इंग्लिश वक्तृत्व व स्तोत्र पाठांतर स्पर्धेमुळे वाचन लेखन कौशल्य वाढते व उच्चारण स्पष्ट होण्यास मदत होते, असे मनोगत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. कुंदा हळबे यांनी व्यक्त केले.

स्पर्धेत शहरातील एकूण २४ शाळांतील १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक स्पर्धेसाठी दोन गट करण्यात आले होते. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याबद्दल कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांनी समाधान व्यक्त केले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. स्पर्धांचे परीक्षण सुवर्णा मिसाळ, दिव्या दौलतानी, भावना वैकर, रंगनाथ देशमुख, श्रीगोपाल जाखोटिया, सुनंदा रच्चा यांनी केले. परीक्षकांनीही विद्यालयाने अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना आपले गुण दाखवण्याची संधी दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा रोख पारितोषिके तसेच प्रशस्तीपत्रक व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूल, समर्थ विद्यामंदिर सावेडी, आयकॉन पब्लिक स्कूल, आठरे पाटील पब्लिक स्कूल, स्नेहालय स्कूल, सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली.

संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, विश्वस्त रामसुख मंत्री, रवींद्र गुजराथी, अरुण झंवर, तसेच विद्यालयाच्या प्राचार्या गगनप्रीत वाधवा यांनी सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यालयाच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे, समन्वयक सुषमा उजागरे हे उपस्थित होते. सूत्रसंचालन मौशमी लोंढे, श्रेय कुमार गुंडू, प्रांजली भोसले, मुग्धा देवकर, शिल्पा मुळे, श्रद्धा कांबळे यांनी केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वाचाळपणाची टिंगलच होणार




महाभारतात विदूर धृतराष्ट्राला म्हणतो,

अपाप्तकां वज्रनं बृहस्पतिरपि ब्रुवन । लगते बुद्धध्यवज्ञानं अवमानंच शाश्वतम।।

खूप सापडतात बोलणारे, पण त्यांचे बोलणे प्रसंगाला न शोभणार नुसते तोडतात अकलेचे तारे. असा बडबडणारा बृहस्पती असला, तरी कामाचा कसला? त्याचा अपमानच होणार श्रोते त्याला हसणार. त्याच्या अकलेची टिंगल करणार, माधवनाथ महाराज म्हणतात,

नुसते शब्दांचे बुडबुडे । ऐसे वक्ते कुडमुडे । ओचित्याचे वावडे । मग अपमानचि धडे ।।

नुसती शब्दांची आतषबाजी काय बाजी मारणार ? प्रसंग काय अन बोलतो काय। मग अक्कल वाया जाय। अपमान तेवढा अभिमान नाही प्रसंगाचे भान. तुकाराम महाराज म्हणतात... त्याचे हाणोनि फोड ताड

संत गाडगेबाबांनादेखील उगाच बडबडणारे आवडत नसत. ते कीर्तनात विषयाला धरुन निरुपण करीत पाल्हाळ नसे. मात्र जिव्हाळा असे.

गाडगेबाबांनी म्हटले आहे,

बोल जो नेटके, असू नये लटके येळेले खटके। न्हाईतर मध्येच अटके त्याले माराव फटके ।।

आवश्यक तेवढेच बोलावे. बोलणे मनापासून असावे, तोंडापुरते नसावे. कुठे काय बोलावे, ते कळावे. बोलताना मध्येच पडू नये. ज्याला हे जमले नाही, त्याला फटके मारुन भानावर आणावे.

मी एका समारंभाला पाहुणा म्हणून गेलो होतो. मी संस्कृतचा प्राध्यापक, हे संयोजकांना ठाउक होते. पाहुणा संस्कृततज्ञ, तर आपण काय अज्ञ? आपणी बोलावे सुसंस्कप्रचुर, असे त्यांनी मनाशी ठरविले असावे. समारंभ सुरु झाला. संयोजक बोलायला उभे राहिले. शब्दबंबाळ वाक्ये. मध्येच ते माझ्याकडे पाहत जणू सुचवत, तुम्हालाच येते काय संस्कृत ?

मग माझा हारतुऱ्यांनी सत्कार झाला. माझा परिचय करुन देण्याचा प्रसंग आला. अजूनही संयोजकाचा संस्कृतमय शब्द वापरण्याचा मोह संपला नव्हता. ते म्हणाले, आजचे पाहुणे हास्थरसात श्रोत्यांना बुडवतात. ते बोलताना खूप हास्य निर्माण करतात. त्यांच्यासारखा हास्यास्पद माणूस शोधून सापडायचा नाही.

**– किशोर गांधी**



जनजाती कल्याण आश्रमाला देणगी सुपूर्द करताना सुमती बकोरे, अभिजीत व अशोक बकोरे, गंधार बकोरे.

# जनजाती कल्याण आश्रमाला देणगी सुपूर्द

नगर – कैलासवासी हरिभाऊ बकोरे यांच्या स्मरणार्थ ८५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचे कुटुंबीय सुमती बकोरे, मुले अभिजीत व अशोक बकोरे आणि नातू गंधार बकोरे यांनी जनजाती कल्याण आश्रम संस्थेला ११ हजारांची देणगी दिली.

यावेळी देणगी स्वीकारताना आश्रमाचे श्रीकांत आपटे, डॉ. नीलकंठ ठाकरे, विशारद पेटकर आणि अनंत पुंड आदी उपस्थित होते. जनजाती कल्याण आश्रम ही संस्था वनवासी डोंगरदऱ्यात राहणाऱ्या समाजासाठी विविध सेवा कार्य आणि उपक्रम राबवते. या संस्थेचे हजारो सेवा प्रकल्प देशभरामध्ये कार्यरत आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जनजाती कल्याण आश्रमाचे डॉ. नीलकंठ ठाकरे यांनी जनजाती कल्याण आश्रमाचे सेवाकार्य, विविध उपक्रम आणि इतर सर्व योजनांबाबतची माहिती सांगितली.

जनजाती कल्याण आश्रमामार्फत हजारो वनवासी विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. सामाजिक जाणीव जपणाऱ्या सर्वांनी या जनजाती कल्याण आश्रमासाठी पैसे, वस्तू व इतर स्वरूपामध्ये देणगी आणि मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# योगी गेंडानाथ महाराज यांच्या स्मरणार्थ भक्तीगीत गायन स्पर्धा

नगर – स्वरबहार फाऊंडेशन आयोजित शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे पुजारी योगी गेंडानाथ महाराज यांच्या स्मरणार्थ जिल्हास्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत एकूण ५४ स्पर्धकांनी सहभाग घेतला. विजेत्यांना विविध पारितोषिके देवून गौरविण्यात आले.

कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, कलाक्षेत्रात प्राविण्य प्राप्त करण्यासाठी प्रचंड जिद्द आणि अथक मेहनत असावी लागते. स्वतःला झोकून देत कलासाधना केल्यास यशाचे अत्युच्च शिखर गाठणे शक्य होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.



योगी गेंडानाथ महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हास्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धेत महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

परीक्षक म्हणून जगदीश वेदपाठक (छत्रपती संभाजीनगर) व संपदा चौधरी यांनी काम पाहिले. साथसंगत हार्मोनियम प्रणव देशपांडे, तबला हर्षद भावे, अजित गुंदेचा, टाळ अच्युत घबाडे यांनी केली. यावेळी सुफी गायक पवन नाईक, विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त चंद्रकांत फुलारी, ज्ञानेश्वर रासकर यांची उपस्थिती होती.

स्पर्धा संयोजक राजेंद्र टाक यांच्या मातोश्रींचे याच दिवशी पहाटे निधन होऊनही स्पर्धा पुढे न ढकलता ठरलेल्या वेळी घेण्यात आल्या. ही माहिती समजताच स्पर्धक, त्यांचे पालक, शिक्षक सर्वांनीच या निर्णयाचे कौतुक करून हळहळ व्यक्त केली. प्रारंभीच स्व. कौशल्याबाई टाक यांना श्रद्धांजली अर्पण करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. आमदार संग्राम जगताप यांनी कार्यक्रमस्थळी दिलेल्या भेटीदरम्यान निधनाचे वृत्त कळताच टाक यांच्या निवासस्थानी भेट देत त्यांचे आणि कुटुंबीयांचे सांत्वन केले.

सूत्रसंचालन मधुवंती धर्माधिकारी यांनी केले. दुपारी सर्वांकरिता प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. स्पर्धेसाठी गणेश धर्माधिकारी, रमेश कारले, निषाद धर्माधिकारी, वरद कारले, बाळासाहेब कारले यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेत मोठ्या गटात – प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी म्हसे, द्वितीय क्रमांक पूनम मापारी, तृतीय क्रमांक अनिता खरात, उत्तेजनार्थ प्रथम अथर्व कोरडे, द्वितीय रचित काबरा तर लहान गटात प्रथम क्रमांक कौशिक नातू, द्वितीय क्रमांक स्वरा पुंड, तृतीय क्रमांक प्रसाद चव्हाण, उत्तेजनार्थ प्रथम स्वानंदी देशमुख, द्वितीय श्रावणी नरोटे यांना रोख रकमेसह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

## माझी वसुंधरा अभियानांतर्गत कार्यशाळा; ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका आणि द आयकॉन पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यात आली. या कार्यशाळेत तब्बल पाचशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




आयकॉन पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्ती दाखविताना विद्यार्थी. समवेत महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे व शाळेचे पदाधिकारी. (छाया – लहू दळवी)

या कार्यशाळेत द आयकॉन पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी मनोभावे शाडू मातीला आकार देत श्री गणेशाच्या विविध रूपातील सुंदर मूर्ती साकारल्या. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. तसेच विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने बनविलेल्या गणेशमूर्तीची आपल्या घरी स्थापना करण्याचा संकल्प केला. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, सुजय मोहिते, प्रशासन संचालक कर्नल आर. सी. राणा, आराधना राणा, विश्वस्त अमित मुथा, पर्यावरणदूत सुरेश खामकर, प्राचार्य दीपिका नगरवाला आदींसह अधिकारी, कर्मचारी, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, गणेशोत्सव हा आपल्या सर्वांचा आवडता उत्सव आहे. लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजामध्ये विविध विषयांवर प्रबोधन करण्याचे काम केले. त्याचप्रमाणे पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचे काम शाडू मातीच्या गणपती बनविण्याच्या कार्यशाळेतून होणार आहे.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, नगर शहरामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा मोठ्या प्रमाणात वापर करावा, जेणेकरून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना पर्याय उपलब्ध होईल आणि त्यामुळे होणारे जलप्रदूषण टाळता येईल. यावर्षी गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. आयकॉन पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी विविध रूपातील गणेशमूर्ती साकारल्या असून, त्यातून त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला आहे. आपल्या उत्सवामुळे आनंद मिळत असला, तरी त्यातून पर्यावरणाची कोणतीही हानी होऊ नये, यासाठी प्रत्येकाने आपल्या घरी शाडू मातीच्या गणपतीची स्थापना करावी, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना तसेच पारंपरिक पद्धतीने काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीबाबत जनजागृतीपर कला सादर केली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.




के. जी. महाविद्यालयात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

# के. जी. महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

नगर – के. जी. महाविद्यालयात ५ सप्टेंबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत तसेच महाविद्यालयच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत उपस्थित होत्या. या कार्यक्रमात शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. डॉ. स्वाती मुनोत यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अत्यंत मोलाची असल्याचे सांगितले. महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांनी शिक्षक दिनानिम्मित शिक्षकांना शुभेच्छा देत विध्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. रोहिणी क्षीरसागर यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. थोरात यांनी केले.

यावेळी डॉ. वर्षा कीर्तने, डॉ. प्रशांत खोपटीकार, प्रा. चाकोते, हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# चौथ्या सोमवारी हरिहरेश्वर महादेव मंदिरात कैलास मानसरोवरची आकर्षक सजावट

नगर – बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिरात हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट) च्या वतीने नित्य सोमवार महाआरतीचा ५४ वा सोहळा तसेच चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त कैलास मानसरोवरची आकर्षक व मनमोहक विशेष सजावट करण्यात आली. या विशेष सजावटीचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

श्रावण महिन्यातील सोमवार हा भगवान महादेवाच्या उपासनेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे चौथ्या श्रावण सोमवारी हरिहरेश्वर महादेव मंदिरात सकाळपासूनच भाविकांची मोठी वर्दळ पाहायला मिळाली. कैलास मानसरोवरच्या संकल्पनेवर आधारित करण्यात आलेली विशेष सजावट भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. कैलास पर्वत आणि मानसरोवराचे धार्मिक महत्त्व भाविकांच्या मनात श्रद्धा निर्माण करणारे असल्याने या सजावटीला विशेष प्रतिसाद मिळाला.

नित्य सोमवार महाआरती भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.



हरिहरेश्वर महादेव मंदिरात चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त कैलास मानसरोवरची केलेली आकर्षक व मनमोहक सजावट.

महाआरतीच्या वेळी हर हर महादेव, बम बम भोलेच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने भगवान हरिहरेश्वर महादेवाचे दर्शन घेत पूजा–अर्चना केली. विशेष सजावटीमुळे मंदिर परिसराला एक वेगळेच आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झाले होते.

कैलास मानसरोवरच्या प्रतिकृतीसदृश करण्यात आलेली सजावट पाहण्यासाठी भाविकांची दिवसभर गर्दी होती. महादेवाचे निवासस्थान मानल्या जाणाऱ्या कैलास पर्वताची आणि पवित्र मानसरोवराची अनुभूती मंदिर परिसरात निर्माण करण्याचा मंडळाचा प्रयत्न भाविकांना विशेष भावला. सजावटीचे दर्शन घेताना अनेक भाविकांनी त्याचे कौतुक केले.

महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त कैलास मानसरोवर ही संकल्पना साकारण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# आयएमएससीडीआरमध्ये विविध उपक्रमांनी शिक्षक दिन साजरा

नगर – भारताचे दुसरे राष्ट्रपती, प्रख्यात तत्त्वज्ञ, विचारवंत आणि शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले.

आय.एम.एस.सी.डी.आर.मधील शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात प्राध्यापक व कर्मचारी यांच्या उपस्थितीत झाली. बी.बी.ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी सुयश गांधी याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर संस्थेच्या इन्चार्ज संचालक डॉ. प्रणोती तेलोरे यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विभागप्रमुख डॉ. हातिम कयुमी, डॉ. महेश पोतदार, अध्यापन व प्रशासकीय कर्मचारी तसेच ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते.



आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये शिक्षक दिनानिमित्त डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना डॉ. प्रणोती तेलोरे व इतर.

प्रा. सायली तोरणे यांनी याप्रसंगी शिक्षक दिनाचे महत्त्व विशद करणारे भाषण केले. आपल्या भाषणातून त्यांनी शिक्षकांची भूमिका, समाज व राष्ट्रनिर्मितीतील त्यांचे योगदान, तसेच नवीन पिढी घडविताना शिक्षकांनी केलेला त्याग याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याशी निगडित विविध पैलूंवरही प्रकाश टाकला.

एम.बी.ए. व एम.सी.ए. विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांसाठी विविध मनोरंजनात्मक व खेळात्मक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. संपूर्ण दिवस आय.एम.एस.च्या प्रांगणात उत्साही, आनंदी आणि शिक्षकांप्रती आदर व्यक्त करणारे वातावरण होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय समितीच्या सदस्य प्रा. गौरी पाटील, प्रा. श्रुती राव यांनी विशेष मेहनत घेतली. आय.एम.एस.चे डिस्टिंग्विश्ड डव्हायझर डॉ. एम. बी. मेहता आणि डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बार्नबस यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे शिक्षकांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाविषयी विद्यार्थ्यांच्या मनात आदर अधिक दृढ झाला. विद्यार्थ्यांचा ग्रंथालयाशी संवाद वाढण्यासोबतच बौद्धिक कुतूहल आणि आजीवन शिक्षणाची भावना प्रोत्साहित झाली. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासाला या उपक्रमातून चालना मिळाली. कार्यक्रमाचा समारोप सामूहिक छायाचित्रणाने झाला. ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस तसेच ग्रंथालय कर्मचारी धनराज घोडके आणि राजेश कांबळे यांनी शिक्षकांना गुलाबाचे फूल देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



## कुरकुरीत ब्रेड भजी

**झटपट रेसिपी**

मित्रांनो, संध्याकाळी चहासोबत तुम्ही छानपैकी ब्रेडची भजी खाऊ शकता. ही कुरकुरीत भजी संध्याकाळच्या वेळी पोटभरीची ठरतील.

**सामग्री:** चार ब्रेड स्लाईस, अर्धा कप दही, पाउण कप बेसन, वाटलेली हिरवी मिरची एक चमचा, थोडी कोथबिर, चवीनुसार मीठ, तेल

**कृती:** ब्रेड स्लाईसच्या कडा कापून घ्या. उरलेल्या ब्रेडचे छोटे तुकडे करून घ्या. आता एका भांड्यात बेसन, मिरची, दही आणि मीठ घालून घट्टसर पीठ बनवून घ्या. त्यात ब्रेडचे तुकडे घाला. आता कढईत तेल गरम करायला ठेवा. आता चमच्याने हे मिश्रण हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. कुरकुरीत आणि खमंग ब्रेड भजी चहासोबत खा.




## नापास विद्यार्थ्याने उभारली कोट्यवधींची कंपनी



**अचिव्हर**

एका परीक्षेत अपयश आल्याने आयुष्य संपत नाही, हे आपल्या कर्तृत्वाने सिद्ध करणारे नाव म्हणजे पी. सी. मुस्तफा! सहावीच्या परीक्षेत नापास झाल्यानंतर शाळा सोडून वडिलांसोबत शेतात मजुरी करणाऱ्या या मुलाने पुढे केवळ शिक्षण पूर्ण केले नाही, तर देशातील आघाडीच्या फूड ब्रँडपैकी एक असलेल्या 'आयडी फ्रेश फूड' या कंपनीची उभारणी केली.

केरळमधील वायनाड जिल्ह्यातील एका अत्यंत गरीब कुटुंबात पी. सी. मुस्तफा यांचा जन्म झाला. वडील शेतमजूर असल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. अभ्यासात विशेष रस नसल्यामुळे ते सहावीच्या परीक्षेत नापास झाले. त्यानंतर त्यांनी शिक्षण सोडले आणि वडिलांसोबत शेतात मजुरी करू लागले. मुस्तफा यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट म्हणजे त्यांच्या गणिताच्या शिक्षकांची भेट! शिक्षक त्यांना शोधत थेट शेतात गेले आणि त्यांनी एक प्रश्न विचारला, 'संपूर्ण आयुष्य मजुरीच करायची आहे की शिक्षण घेऊन स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य बदलायचे आहे?' या प्रश्नाने मुस्तफा यांना आत्मपरीक्षण करायला भाग पाडले. त्यांनी पुन्हा शाळेत प्रवेश घेतला आणि कठोर मेहनतीच्या जोरावर सातवीत प्रथम क्रमांक मिळवला. त्यानंतर दहावीच्या परीक्षेतही त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

आर्थिक अडचणी असूनही त्यांना महाविद्यालयात मोफत प्रवेश आणि भोजनाची सुविधा मिळाली. केरळ अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेत चांगली रँक मिळवत त्यांनी इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. सुरुवातीला इंग्रजी भाषेचे मोठे आव्हान होते; मात्र त्यांनी सातत्याने मेहनत घेत ती अडचणही दूर केली. नोकरीचा अनुभव घेतल्यानंतर त्यांनी देशातील प्रतिष्ठित व्यवस्थापन संस्था 'आयआयएम' बंगळुरू येथून व्यवस्थापनाचे शिक्षण पूर्ण केले.

२००५ मध्ये मुस्तफा यांनी चार चुलत भावांसह बेंगळुरूमध्ये ताजे इडली आणि डोसा पीठ विकण्याचा छोटा व्यवसाय सुरू केला. गुणवत्तेवर भर आणि ग्राहकांचा विश्वास यांच्या जोरावर हा व्यवसाय वेगाने वाढत गेला. आज 'आयडी फ्रेश फूड' हा भारतातील अग्रगण्य फूड ब्रँडपैकी एक असून, त्याची उत्पादने भारतासह अनेक देशांमध्ये विकली जातात. लाखो कुटुंबांच्या स्वयंपाकघरापर्यंत या कंपनीची उत्पादने पोहोचली आहेत. पी. सी. मुस्तफा यांची कहाणी प्रत्येक विद्यार्थी आणि तरुणासाठी प्रेरणादायी आहे. परीक्षेत नापास होणे म्हणजे आयुष्याची हार नसते. योग्य मार्गदर्शन, कठोर परिश्रम, सातत्य आणि स्वतःवरील विश्वास यांच्या बळावर आपण प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मोठे यश मिळवू शकतो.

## शेर की जुबानी

जिंदगी गुजर जाए पर
दोस्ती कम न हो,
याद हमें रखना
चाहे पास हम न हो।

तारों में अकेला चांद जगम गाता है,मुश्कीलों में अकेला इन्सान डगमगाता है,
कांटो से मत घबराना मेरे दोस्त,
क्योंकी कांटों में भी गुलाब मुस्कुराता है।

कभी रात में तारे गिनके देख लेना,
जितना तुम गिन पाए उतना तुम हमें यात करते हो,
और जितने तारे बच जाए उतना हम तुमको याद करते हैं।

## 'रेझ्युमे' अधिक चांगला कसा कराल?




**सल्ला मोलाचा**

'डिजिटलायझेशन'च्या युगात नोकरी शोधण्याची प्रक्रिया झपाट्याने बदलत आहे. कंपन्यांकडे आज वेळेची कमतरता असून प्रत्येक उमेदवाराचा सीव्ही सखोलपणे वाचला जात नाही. त्यामुळेच आता जुन्या पद्धतीचे रेझ्युमे चालत नाहीत. त्याऐवजी कमी पण योग्य आणि प्रभावी माहिती असलेला सीव्ही महत्त्वाचा ठरत आहे.

आजही अनेकजण आपल्या 'सीव्ही'मध्ये वैयक्तिक माहिती, जसे की वैवाहिक स्थिती, धर्म, जन्मतारीख, आई-वडिलांची नावे अशा बाबी नमूद करतात; परंतु या माहितीचा नोकरीशी थेट काही संबंध नसतो. यामुळे सीव्ही लांबतो आणि मुख्य गोष्टींचे महत्त्व कमी होते. या जागेचा वापर आपण LinkedIn प्रोफाईल, पोर्टफोलिओ लक्स, ऋर्ळीकील प्रोफाईल (IT क्षेत्रासाठी) यासाठी करू शकता. मोबाइल क्रमांक आणि ई-मेल मात्र अनिवार्य असावेत. कारण हेच तुमच्याशी संपर्क ठेवण्यासाठी मुख्य साधन ठरतात.

**'ऑब्जेक्टिव्ह' ठरवा**

एक मोठी चूक अनेक उमेदवार करतात, ती म्हणजे एकच 'Career Objebtive' अनेक ठिकाणी वापरणे; मात्र प्रत्येक कंपनीची गरज, कार्यपद्धती आणि संस्कृती वेगळी असते. त्यामुळे ज्या संस्थेसाठी अर्ज करत आहात, त्यानुसार ऑब्जेक्टिव्ह ठरवणे गरजेचे आहे. यामुळे 'एचआर' ला उमेदवाराच्या गंभीरतेचा आणि नोकरीसाठीच्या तत्परतेचा अंदाज येतो. केवळ नोकरीसाठी सुसंगत अनुभवच नमूद करा.

आपल्याकडे अनेक नोकरी कवा इंटर्नशिपचा अनुभव असतो; पण त्या सर्व नोंदवणे ही चूक ठरू शकते. कारण प्रत्येक अनुभव आवश्यकच असेल असे नाही. त्याऐवजी, संबंधित जॉबच्या भूमिकेशी जुळणारेच अनुभव समाविष्ट करा. यामुळे 'एचआर'चे वाचन सुकर होते आणि 'सीव्ही' अधिक लक्षवेधी ठरतो.

**स्पर्धा आणि उपक्रम गरजेपुरतेच लिहा**

शाळेतील लहान वयातील स्पर्धा, निबंध, चित्रकला अशा गोष्टी जर नोकरीशी संबंधित नसतील, तर त्यांचा उल्लेख टाळा. त्याऐवजी, शैक्षणिक प्रगती, मिळवलेली स्कॉलरशिप, संबंधित कोर्सेसचे उल्लेख फायदेशीर ठरू शकतात.

## कडेगावचे सागरेश्वर अभयारण्य



**भटकंती**

सह्याद्री पर्वतरांगेच्या कुशीत कडेगाव तालुका विसावला आहे. सध्या पाऊस कोसळत असल्याने डोंगरदऱ्या हिरव्यागार झाल्याने येथे निसर्गसौंदर्यात वाढ झाली आहे. अतिशय नयनरम्य डोळ्यांचे पारणे फेडणारा, मनाला सुखद अनुभव देणारा, निसर्गाच्या कुशीत वसलेले येथील सागरेश्वर अभयारण्य, चौरंगीनाथ व डोंगराई मंदिर परिसर पर्यटकांना खुणावू लागला आहे.

कडेगाव शहरापासून तीन ते चार किलोमीटरवर डोंगराई मंदिर आणि पर्यटनस्थळ आहे. या डोंगरावर जाण्यासाठी सुरुवातीलाच सुंदर कमान उभारण्यात आली आहे. त्यानंतर नागमोडी वळणाचा घाट असून, येथील निसर्गसौंदर्य पर्यटकांना आकर्षित करत आहे. डोंगरावर हिरवेगार पठार आहे. येथून कडेगाव शहरासह भरगच्च पाण्याने भरलेला तलाव आणि आजूबाजूचा नयनरम्य परिसर आपणास पाहायला मिळत आहे. भाविकांना राहण्यासाठी खोल्या बांधण्यात आल्या आहेत. येथील वाघजाई, तरस गुहा प्रसिद्ध आहे. या ठिकाणी विविध पक्षी, वन्यप्राणी आणि औषधी वनस्पती आढळतात.

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे सागरेश्वर घाट आणि येथील मानवनिर्मित सागरेश्वर अभयारण्य खऱ्या अर्थाने पर्यटकांना खुणावत आहे. दाट झाडी आणि जंगल पर्यटकांचा ओढा वाढवत आहेत. या ठिकाणी पर्यटकांना देवताळ, बालोद्यान, छत्रीबंगला, वेणुविहार तलाव, घोडेबिळ, तरस गुहा, बाणदार, रणशुळा, शिखर, महानगुंड, किर्लोस्कर पॉइंटवर पर्यटकांची गर्दी वाढत आहे. तसेच विविध प्रकारचे प्राणीही आढळतात. यामध्ये प्रामुख्याने हरण, तरस, लांडगा, कोल्हा, खोकड, साळिंदर, खवले मांजर, चितळ, काळवीट, चिंकाऱ्यासह विविध प्रकारचे पक्षी यामध्ये घार, ससाणा, पारवा, पिंगळा, तांबडा होला, खंड्या सुतार, धनचडी, सुगरण, बगळा वगैरे आढळतात. विविध प्रकारच्या वनस्पती, फळझाडेही येथे पाहावयास मिळतात. वेळेवगेळ्या प्रकाराची अनेक प्राचीन मंदिरेही पाहावयास मिळतात.

कडेगाव शहरापासून १६ किलोमीटरवर सोनसळ येथील ऐतिहासिक आणि पौराणिक चौरंगीनाथ मंदिर आहे. हे मंदिर चारी बाजूंनी सह्याद्रीच्या पर्वतरांगेत व निसर्गाच्या कुशीत वसलेले आहे. सोनसळ येथील डोंगर व चौरंगीनाथ मंदिर परिसर पावसामुळे आकर्षक दिसत आहे. या दोन्ही ठिकाणची नयनरम्य दृश्ये टिपण्यासाठी व त्याचा मनमुराद आनंद घेण्यासाठी पर्यटक गर्दी करीत आहेत.

## अॅप वर्ल्ड



**वाचवा पैसे आणि वेळही!**

स्मार्टफोन वापरणारी जवळपास प्रत्येक व्यक्ती मार्ग शोधण्यासाठी 'गुगल मॅप्स'चा वापर करते; मात्र हे अॅप केवळ लोकेशन शोधण्यापुरते मर्यादित नाही, तर योग्य 'सेटिंग्ज ऑन' केल्यास दैनंदिन प्रवासातील पेट्रोल, टोल आणि वेळेची मोठी बचत होऊ शकते. बदलत्या ट्रॅफिकनुसार मार्ग निवडणे आणि वेग मर्यादित ठेवणे यामुळे वाहतूक पोलिसांच्या दंडात्मक कारवाईपासूनही वाचता येते.

महामार्ग किंवा शहरातील रस्त्यांवर वेगमर्यादा दिसत नाही आणि ट्रॅफिक कॅमेरे त्वरित चलान फाडतात. 'गुगल मॅप्स'मध्ये 'इन-बिल्ट स्पीडोमीटर' आणि 'स्पीड लिमिट फीचर' आहे. अॅप उघडून प्रोफाइल फोटोवर टॅप करा, नेव्हिगेशन सेटिंग्जवर जा आणि स्पीडोमीटर तसेच स्पीड लिमिट टॉगल ऑन करा. वेग मर्यादेपेक्षा जास्त गेल्यास स्क्रीनवर तात्काळ व्हिज्युअल अलर्ट येतो. त्यामुळे ओव्हरस्पीडिंगसाठीचे चलान टाळता येतो. दुसरे महत्त्वाचे फीचर म्हणजे पर्यावरणपूरक आणि इंधन-कार्यक्षम मार्ग. 'एआय'-आधारित अल्गोरिदम उतार, कोंडी आणि वारंवार थांबणे लक्षात घेऊन सर्वात कमी इंधन वापराचा मार्ग सुचवतो. 'नेव्हिगेशन सेटिंग्ज'मध्ये इंधन कार्यक्षम मार्गांना प्राधान्य द्या. स्थिर वेग राखल्याने अचानक ब्रेक आणि अॅक्सलरेशन कमी होते. त्यामुळे पेट्रोलचा वापर १०-१५ टक्के कमी होऊ शकतो.

लांबच्या प्रवासात महागडे टोल प्लाझा टाळण्यासाठी मार्ग पर्यायांमध्ये 'टोल टाळा' निवडा किंवा टोल दर पहा. प्रवास सुरू करण्यापूर्वीच किती टोल लागेल हे कळते आणि स्वस्त किंवा टोल-फ्री मार्ग निवडता येतो. नेटवर्क नसलेल्या भागात किंवा डोंगरामध्ये ऑफलाइन मॅप आधीच डाउनलोड करा. प्रोफाइल वरून ऑफलाइन मॅप्स सेव्ह करा. इंटरनेटशिवायही नेव्हिगेशन सुरू राहते आणि भटकंतीमुळे पेट्रोल व वेळ वाया जात नाही.

## एआय वर्ल्ड



**'गुगल अर्थ'ने हटवले 'क्रिएट इमेज'**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रयोग होत आहेत; मात्र प्रत्येक नव्या तंत्रज्ञानासोबत त्याच्या गैरवापराचाही धोका वाढत आहे. 'गूगल अर्थ' मधील 'क्रिएट इमेज' या नव्या फीचरबाबतही असेच घडले. 'गूगल' ने मोठ्या उत्साहात हे फीचर सादर केले; पण तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या गंभीर चिंतेनंतर कंपनीला अवघ्या २४ तासांत ते तात्पुरते मागे घ्यावे लागले.

'गूगल' ने ३० जुलै रोजी 'गूगल अर्थ' मध्ये 'क्रिएट इमेज' हे नवीन फीचर सुरू केले होते. हे फीचर 'गूगल' च्या 'नॅनो बनाना २ इमेज जनरेशन' तंत्रज्ञानावर आधारित होते. या सुविधेद्वारे वापरकर्ते 'गूगल अर्थ' वरील कोणतेही ठिकाण निवडून 'क्रिएट इमेज' या पर्यायावर क्लिक करत. त्यानंतर त्यांना हवी असलेली प्रतिमा शब्दांमध्ये (प्रॉम्प्ट) वर्णन करायची आणि 'एआय' काही सेकंदांमध्ये 'गूगल अर्थ' च्या उपग्रह, एरियल आणि 'थ्री डी मॅपिंग डेटा'च्या आधारे नवीन प्रतिमा तयार करून देत असे. 'गूगल' च्या मते, या फीचरमुळे शहरी नियोजन, वास्तुकला, शिक्षण, संशोधन आणि सर्जनशील कामांसाठी मोठी मदत होणार होती.

फीचर सुरू झाल्यानंतर काही तासांमध्येच अनेक संशोधक, 'ओपन सोर्स इंटेलिजन्स' तज्ज्ञ आणि सॅटेलाइट प्रतिमा विश्लेषकांनी त्यावर आक्षेप घेतला. त्यांच्या मते, या तंत्रज्ञानाच्या मदतीने अशा सॅटेलाइट प्रतिमा तयार करता येऊ शकतात, ज्या पाहायला अगदी खऱ्यासारख्या वाटतील; पण प्रत्यक्षात त्या 'एआय' ने तयार केलेल्या असतील. अशा बनावट प्रतिमांमुळे 'सोशल मीडिया'वर दिशाभूल करणारी माहिती वेगाने पसरू शकते. युद्ध, नैसर्गिक आपत्ती, सीमावाद किंवा लष्करी हालचालींसारख्या संवेदनशील विषयांवर खोटी माहिती पसरवण्यासाठी याचा गैरवापर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. या चिंतेनंतर 'गूगल' ने अधिक मजबूत सुरक्षा व्यवस्था तयार होईपर्यंत हे फीचर तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेतला.

## १८व्या वर्षीच बनला प्राध्यापक!



**नवल विशेष**

जगभरातील बहुतांश तरुण वयाच्या १८व्या वर्षी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्याच्या किंवा पहिल्या-दुसऱ्या सत्रामध्ये स्थिर होण्याच्या तयारीत असतात; मात्र अमेरिकेतील फ्लोरिडाच्या नॅथन थॉमस या तरुणाने तब्बल ३०६ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडत प्राध्यापक होण्याचा मान मिळविला आहे. नॅथन फ्लोरिडाच्या प्रतिष्ठित मियामी डेड महाविद्यालयात अभियांत्रिकाचा प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांना शिकवत आहे.

नॅथनचा हा प्रवास अचंबित करणारा आहे. याआधी १७१७मध्ये स्कॉटलंडमधील गणितज्ञ मॅकलोरीन वयाच्या १९व्या वर्षी प्राध्यापक झाले होते. त्यांचा हा विक्रम आतापर्यंत अबाधित होता; मात्र नॅथनने १८ वर्षे ३४६ दिवस वयाचा असताना जगातील सर्वात तरुण प्राध्यापक होण्याचा मान मिळविला आहे. गिनीज बुकमध्येही या विक्रमाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे नॅथनच्या वर्गातील अनेक विद्यार्थी त्याच्याच एवढे आहेत. नॅथनच्या कुटुंबात अनेक अभियंते असून, लहानपणापासूनच विज्ञान आणि अभियांत्रिकीची आवड निर्माण झाली. गणिताची गोडी लावण्याचे आणि विज्ञानाचा भक्कम पाया घालण्याचे श्रेय तो आपल्या आईला देतो.

अभियांत्रिकीपुरतेच नॅथनचे ध्येय मर्यादित नाही. अध्यापनासोबतच तो मियामी विधी विद्यापीठामध्ये 'ज्युरिस डॉक्टर' पदवीचे शिक्षण घेत असून २०२८ मध्ये पदवी पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. बौद्धिक संपदा कायद्यात विशेष प्रावीण्य मिळवून विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील नवकल्पनांच्या संरक्षणासाठी काम करण्याची त्याची इच्छा आहे. अभियांत्रिकीमुळे विकसित झालेली तार्किक विचारशक्ती आणि समस्या सोडवण्याची क्षमता कायद्याच्या शिक्षणातही तितकीच उपयुक्त ठरत असल्याचे तो सांगतो.

माझ्याच एवढ्या विद्यार्थ्यांना शिकवताना कधीच संकोच वाटला नाही. शिकण्याला वयाची मर्यादा नसते. जिज्ञासा, मेहनत आणि सातत्य या गोष्टीच खऱ्या अर्थाने महत्त्वाच्या असतात. वर्गात प्रत्येक जण काहीतरी नवीन शिकण्यासाठी, स्वतःला अधिक सक्षम बनवण्यासाठी आणि प्रगतीसाठीच येतो. विद्यार्थ्यांना एखादी कठीण संकल्पना समजल्याचा क्षण हा शिक्षक म्हणून समाधान देणारा आहे, असे नॅथन थॉमस सांगतो.

नॅथनने शालेय शिक्षण सुरू असतानाच अवघ्या दहाव्या वर्षी दुहेरी नोंदणी कार्यक्रमांतर्गत मियामी डेड कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. वयाच्या १४व्या वर्षी त्याने फ्लोरिडा आंतरराष्ट्रीय विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला. तेथे त्याने विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण केले. काही वर्षांनी तो ज्या महाविद्यालयात बालविद्यार्थी म्हणून शिकला होता, त्याच ठिकाणी प्राध्यापक म्हणून परतला आहे. ऑगस्ट २०२३ पासून तो अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना 'सी फॉर इंजिनिअर्स' हा अभ्यासक्रम शिकवत आहे. या अभ्यासक्रमात 'सी' ही संगणकीय भाषा आणि संगणकीय समस्या सोडविण्याची तंत्रे शिकवली जातात.

## पेपरफुटीवर तंत्रज्ञानाचा उपाय



**तंत्रज्ञान**

परीक्षांमध्ये पेपरफुटी ही सततची समस्या बनली आहे. गेल्या १२ वर्षांमध्ये १५०हून अधिक परीक्षांचे पेपर फुटले आहेत. यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात गेले आहे. आता प्रश्न उपस्थित होत आहे की, तंत्रज्ञान या समस्येवर तोडगा काढू शकते का?

याचे उत्तर आहे, 'हो'! 'एन्क्रिप्टेड डिजिटल' प्रश्नपत्रिका ही एक प्रभावी पद्धत आहे. परीक्षा सुरू होईपर्यंत प्रश्नपत्रिका पूर्णपणे 'एन्क्रिप्टेड' राहते. तिला उघडण्यासाठी अनेक स्तरांची पडताळणी करावी लागते. 'एआय' आधारित प्रश्न तयार करणेदेखील उपयुक्त ठरू शकते. प्रत्येक विद्यार्थ्याला वेगवेगळ्या क्रमाने प्रश्न मिळतील. त्यामुळे संघटित कॉपी रोखता येईल. बायोमेट्रिक पडताळणीने परीक्षा केंद्रात प्रवेश आणि ओळख निश्चित करता येईल. 'एआय' प्रणाली परीक्षा केंद्रातील हालचाली रिअल टाइममध्ये निरीक्षण करू शकते. कोणतीही असामान्य हालचाल शोधून ती सतर्कता वाळगू शकते. 'डिजिटल ऑडिट ट्रेल'द्वारे प्रश्नपत्रिकेचा प्रत्येक वापर नोंदवला जाईल. त्यामुळे दोषींना शोधणे सोपे होईल.

तज्ज्ञांच्या मते,तंत्रज्ञान कितीही प्रगत असले तरी मानवी भूमिका पूर्णपणे संपणार नाही. प्रश्न तयार करणे, मान्यता देणे आणि उत्तरपत्रिका तपासणे यात मानवी हस्तक्षेप आवश्यक आहे.

## सांभाळा शरीराचा तोल



**फिटनेस फंडा**

आपल्याला आपल्या शरीराचा तोल सांभाळता आला पाहिजे. तोल सांभाळण्याचा सराव तुम्ही करू शकता. शरीराचा तोल सांभाळण्याचे लाभ जाणून घेऊ.

* तोल सांभाळण्याच्या सरावामुळे तुमचे सांधे, स्नायू बळकट होतात. गुडघे, पायाच्या घोट्यालगतच्या स्नायूंना याचा लाभ होतो.
* शरीराचा तोल सांभाळण्याचं तंत्र गवसल्यामुळे दुखापतीची शक्यता कमी होते.
* शरीराचा तोल सांभाळण्याचा सराव करण्याआधी शरीराची क्षमता तपासून घ्या. यासाठी एका पायावर उभे रहा. अशा स्थितीत किती वेळ उभं रहाता येतं हे बघा. साधारण मिनिटभर या स्थितीत उभं रहाता यायला हवं.
* तोल सांभाळण्यासाठी स्क्वॅट्स करायला सुरूवात करा. यामुळे पाय, पोटऱ्या आणि मांड्यांचे स्नायू बळकट होतील आणि एका पायावर तोल सांभाळणं शक्य होईल.
* एका पायावर शरीराचा तोल सांभाळायचा सराव करा. स्क्वॅट्सच्या तुलनेत हा व्यायामप्रकार थोडा कठीण आणि गुंतागुंतीचा आहे. मात्र यामुळे तुम्हाला तोल सांभाळण्याचं तंत्र गवसेल.
* योगासनं करताना शरीराच्या स्थितीत सतत बदल होत असतात. यामुळे शरीराचा तोल साधणं शक्य होतं. अगदी साधी योगासनं करतानाही वेगवेगळ्या स्नायूंवर ताण येतो. या सगळ्याचे लाभ शरीराला होतात.

## कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करायचंय?



**वेगळ्या वाटा**

सध्या ऑनलाईन शॉपिंगचा बराच बोलबाला आहे. विविध ऑनलाईन साईट्स ग्राहकांवर सवलतींची खैरात करतात. मोबाईल फोनसह विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या किमतीत मिळतात. अशा ऑनलाईन शॉपिंग साईट्समुळे दुकानदारांपुढे बरीच आव्हानं उभी राहिली. तरुण मंडळी ऑनलाईन खरेदी करत असली तरी अनेकांना वस्तू प्रत्यक्ष बघून, स्पर्श करून खरेदी करायला आवडतं. सध्याच्या तीव्र स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी दुकानदारही वेगवेगळे फंडे लढवत असतात. त्यातूनच कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना उदयाला आली आहे. या कॉन्सेप्ट स्टोअरच्या माध्यमातून तुम्हीही उद्योजक बनू शकता. याबाबतचं मार्गदर्शन...

कॉन्सेप्ट स्टोअर विशिष्ट संकल्पनेवर आधारित असतं. म्हणजे या स्टोअर्समध्ये ठराविक उत्पादनं विक्रीसाठी ठेवली जातात. काही दुकांनांमध्ये फक्त सौंदर्यप्रसाधनं मिळतात तर काहींमध्ये गृहोपयोगी वस्तू असतात. पुस्तकं, सजावटीच्या वस्तू अशा विविध संकल्पनांवर आधारित असणारी ही स्टोअर्स आता लोकप्रिय ठरत आहेत. ठराविक ग्राहकवर्ग समोर ठेऊन हे स्टोअर सुरू केलं जातं.

कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना अजूनही नवी आहे. त्यामुळे हा प्रकार लोकप्रिय होईपर्यंत थोडं थांबावं लागेल. दुसरं म्हणजे कॉन्सेप्ट स्टोअर्स नेहमीच्या दुकानांपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. ही स्टोअर्स ग्राहकांना आपल्याशी जोडून घेण्याचा पयत्न करतात. त्यांच्याशी जोडलेली रहातात. त्यामुळे कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करताना ही बाब नेहमी लक्षात ठेवा.

## पुरुषांच्या वॉर्डरोबमधील सदाबहार फॅशन



**फॅशन-पॅशन**

पांढरा शर्ट कधीही फॅशनबाहेर जात नाही. त्याचा साधेपणा हीच त्याची खरी ओळख आहे. योग्य पद्धतीने स्टाइल केल्यास एकाच पांढऱ्या शर्टमधून ऑफिसपासून पार्टीपर्यंत प्रत्येक ठिकाणी वेगळा आणि आकर्षक लूक मिळू शकतो.

साधा, आरामदायी आणि स्टायलिश लूक हवा असेल तर पांढरा शर्ट आणि निळी जीन्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. त्यासोबत हलक्या तपकिरी रंगाचा बेल्ट आणि कॅज्युअल शूज घातल्यास लूक अधिक उठून दिसतो. डेट, आउटिंग किंवा सेमी-फॉर्मल कार्यक्रमांसाठी हा पेहराव योग्य ठरतो. औपचारिक कार्यक्रमांसाठी पांढरा शर्ट आणि काळा सूट हे क्लासिक संयोजन मानले जाते. नीट इस्त्री केलेला शर्ट, फिटिंगची पँट, काळे शूज आणि टाय यामुळे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी दिसते. ऑफिस मीटिंग, लग्नसमारंभ किंवा पार्टीसाठी हा लूक कायम लोकप्रिय आहे. हलका पण संतुलित लूक हवा असेल तर ग्रे पँटसोबत पांढरा शर्ट उत्तम दिसतो. ब्लेझरसह हा लूक अधिक आकर्षक बनतो, तर ब्लेझरशिवायही तो स्मार्ट आणि आरामदायी वाटतो.

नेव्ही ब्लेझर आणि पांढरा शर्ट हे एलिगंट संयोजन आहे. बिझनेस मीटिंग किंवा स्मार्ट कॅज्युअल प्रसंगांसाठी हा पेहराव योग्य ठरतो. टायसह किंवा कॉलर खुला ठेवूनही हा लूक तितकाच प्रभावी दिसतो. कॅज्युअल आणि सेमी-फॉर्मल लूकमध्ये समतोल साधायचा असेल, तर खाकी पँटसोबत पांढरा शर्ट घाला. शर्टची बाह्या हलक्या दुमडल्यास अधिक रिलॅक्स लूक मिळतो, तर शर्ट इन केल्यास अधिक शार्प आणि नीटनेटका लूक दिसतो.

पांढऱ्या शर्टसोबत स्टायलिश शूज किंवा स्निकर्स घातल्यास साध्या पेहरावालाही आधुनिक स्पर्श मिळतो. यासोबत घड्याळ, बेल्ट यांसारख्या साध्या ॲक्सेसरीज वापरल्यास संपूर्ण लूक अधिक आकर्षक बनतो. एकूणच, पांढरा शर्ट हा केवळ एक कपडा नसून अनेक स्टाइल्सचा आधार आहे. योग्य फिटिंग, योग्य रंगसंगती आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर तो प्रत्येक पुरुषाला उठून दिसणारा आणि आकर्षक लूक देऊ शकतो.

# सरस्वती हॉस्पिटलमधील सेवाभाव रूग्णांसाठी वरदान

## संगमनाथ महाराज यांचे प्रतिपादन; सरस्वती हॉस्पिटलच्या नूतनीकृत व विस्तारित सुपर स्पेशालिटी सुविधांचे लोकार्पण

नगर – आई व तिच्या बाळाच्या भावनिक नात्याला आपुलकीचे कोंदण देणारे माळीवाडा येथील सरस्वती हॉस्पिटलचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये रूपांतर झाले आहे. दशकपूर्तीकडे वाटचाल करताना सुरू झालेल्या या आरोग्य सेवेच्या नवीन पर्वाचे लोकार्पण ६ सप्टेंबर रोजी श्री विशाल गणपती मंदिराचे पुजारी पूज्य संगमनाथ महाराज यांच्या हस्ते आणि पूज्य साध्वी नर्मदाजी माता यांच्या आशीर्वादाने झाले.



सरस्वती हॉस्पिटलच्या नूतनीकृत व विस्तारित सुपर स्पेशालिटी सुविधांचे लोकार्पण करताना श्री विशाल गणपती मंदिराचे पुजारी संगमनाथ महाराज व मान्यवर.

याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, आ. गोपीचंद पडळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार निलेश लंके यांनीही हॉस्पिटलला भेट देऊन डॉ. जाधव व त्यांच्या टीमला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सर्वपक्षीय नगरसेवक, राजकीय पदाधिकारी, वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच हॉस्पिटलचे संचालक डॉ.अमोल जाधव, डॉ. प्राजक्ता जाधव, बाबासाहेब जाधव, मिनाताई सत्रे, सुरेश जाधव, संजय जाधव, मनपाच्या स्थायी समितीच्या माजी सभापती सुवर्णा जाधव, दत्ता जाधव व जाधव परिवारातील सदस्य उपस्थित होते.

संगमनाथ महाराज म्हणाले की, संपूर्ण जाधव परिवार सेवाभावी वृत्तीचा आहे. डॉ. अमोल जाधव यांनी ९ वर्षांपूर्वी या हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवताना हाच सेवाभाव केंद्रस्थानी ठेवला. त्यामुळे येथे येणाऱ्या रूग्णांना चांगल्या आरोग्याचे वरदान लाभते. याठिकाणी दाम्पत्याच्या जीवनातील गोंडस स्वप्ने जन्म घेतात.येथील नवीन सुविधांचा रूग्णांना चांगला लाभ होईल.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगरमधील वैद्यकीय क्षेत्रात सरस्वती हॉस्पिटलने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. डॉ. अमोल जाधव व त्यांची टीम नेहमीच रूग्णांना आपुलकीची सेवा देतात. माता भगिनींना चांगले आरोग्य देतानाच विविध उपक्रम राबवून त्यांच्या सक्षमीकरणासाठीही प्रयत्न केले जातात. हॉस्पिटलमध्ये आता सुपर स्पेशालिटी आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे रूग्णांना आपल्या शहरातच दर्जेदार उपचार मिळतील. मोठ्या महानगरांप्रमाणेच उच्च तंत्रज्ञानयुक्त उपचार सुविधा नगरमध्ये उपलब्ध होत असल्याने शहराबरोबरच ग्रामीण भागातील रूग्णांची चांगली सोय होत आहे.

स्वागत करताना डॉ. अमोल जाधव यांनी हॉस्पिटलमधील सुपर स्पेशालिटी सुविधांची माहिती दिली. हॉस्पिटलचा ६० बेडपर्यंत विस्तार आणि अत्याधुनिक सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. याठिकाणी आता सुपर डव्हान्स लॅप्रोस्कोपी सुविधा उपलब्ध झाली आहे. गायनेकोलॉजी, जनरल सर्जरी, युरोलॉजी या सर्व विभागांसाठी एकत्रितपणे वापरता येणारी अत्याधुनिक लॅप्रोस्कोपी सिस्टम उपलब्ध करण्यात आली आहे. ४ के/ एचडी व्हिज्युलायझेशन सिस्टीममुळे अत्यंत स्पष्ट आणि झूम डिटेल्स दिसत असल्याने शस्त्रक्रिये दरम्यान अधिक अचूकता मिळण्यास मदत होते. सुरक्षित टिश्यू कटिंग आणि ब्लीडिंग कंट्रोलसाठी आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. यामुळे विविध रोगांवरील शस्त्रक्रिया, हर्निया, गॉलब्लॅडर, अपेंडिक्स, किडनी, प्रोस्टेट, संबंधित शस्त्रक्रिया अधिक अचूक होण्यास मदत होते. कॉर्पोरेट हॉस्पिटल लेव्हलचे हाय–कॉस्ट, हाय–परफॉर्मन्स मशीन कार्यान्वित झाले आहेत. मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर, सुसज्ज प्रसूती व स्त्री रोग विभाग, डव्हान्स लेबर आणि डिलिव्हरी कक्ष, हाय रिस्क प्रेगनन्सी आणि डिलिव्हरी युनिट, ३ डी/४डी सोनोग्राफी, अधिकृत एमटीपी व कुटुंब नियोजन केंद्र, प्रसूती आयसीयू, शस्त्रक्रिया विभाग, १० बेडचा आयसीयु, जनरल सर्जरी, कॅन्सर विभाग, कान, नाक, घसा सर्जरी, ऑर्थोपेडिक सर्जरी, तोंडाच्या सर्जरी, एनोरेक्टल सर्जरी अशा अत्याधुनिक सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मॉड्युलर ऑपरेशन थिएटर मुळे अधिक सुरक्षित, इन्फेक्शन कंट्रोल आणि उच्च दर्जाची शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध झाली आहे. आई व बाळाला सुरक्षित संसर्ग विरहित वातावरण मिळण्यासाठी खास डिझाईन केलेले सुसज्ज डिलिव्हरी रूम साकारण्यात आले आहे.

सर्व रिपोर्ट ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतात. विश्वसनीय आणि आपुलकीच्या रूग्ण सेवेची परंपरा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून अखंडित चालू राहील अशी ग्वाही डॉ. जाधव यांनी दिली.



## गुरुवाणी – ४४
## तप साधनेचे महत्त्व

आहार योग्य नसल्याने सध्या अनेक आजार बळावत आहेत. मेडिकल सायन्स सुद्धा हेच सांगत आहे. तुम्ही जे खाता ते पचन्यासाठी काही वेळ लागतो. पचन होण्यासाठी पूर्ण सिस्टीम कार्यान्वित व्हावी लागते. मग तुम्ही दोन घास खा कि दोन रोटी खा. तितकेच एन्झाईम लागतात. रात्री भोजन सोडले तर शरीरातील साफसफाई चांगली होते. फॅट बर्न होतात. 'रात्र भोजन नही करना ये धर्म है'. शरीराचे स्वतःचे एक स्वतंत्र घड्याळ असते, ते सूर्यानुसार चालते.

इंद्रभूती गौतमने भगवान महावीरांना विचारले, दिवसाला दिवस आणि रात्रीला रात्र का म्हणतात? महावीरांनी उत्तर दिले, 'दिवसा पदार्थांचे रंग, गंध, टेस्ट, तापमान, स्पर्श पॉझिटिव्ह असतात. रात्री या गोष्टी निगेटिव्ह असतात'. आधुनिक सायन्सने सुद्धा जैनिझमच्या अनेक गोष्टी सिद्ध केल्या आहेत. दिवसा बनवले दिवसा खाल्ले तरच ते शुद्ध असते. रात्री बनवलेलं दिवसा खाल्ले तर ते निगेटिव्ह असते. जेवण तयार करताना जो भाव मनात असतो तो भाव खाणाऱ्यात उतरतो. बाजारात जे पदार्थ तयार होतात ते पैसे कमावण्यासाठी असतात. तयार करणाराच्या मनात लोभ असतो. म्हणून बाहेरचं खाणं टाळले पाहिजे. स्वयंपाक घर मंदिर आणि भोजन भगवंताचा प्रसाद बनले पाहिजे. आता स्वयंपाक घर जाऊन किच किच करणारे किचन आले आहे. अनेक लोकांचे वैद्यकीय रिपोर्ट व्यवस्थित असूनही त्यांना त्रास असतो. याचे कारण अतिरिक्त व चुकीचा आहार आहे. खाता चांगले पण आत ते सडते. हे सडणे बंद करायचे तर पोट रिकामे असणे अत्यावश्यक असते. तुमचे पोट भरल्यावर सुद्धा कोणी आग्रहाने बळजबरी खाऊ घालत असेल तर तो तुमचा शत्रू असतो. दोन आहारात कमीत कमी ६ तासांचे अंतर असावेच. रात्री झोपण्यापूर्वी सहा तास आधी आहार बंद केला पाहिजे. पोटाला आराम मिळाला तरच संपूर्ण शरीराला आराम मिळेल. ज्यावेळी भूक लागली तरीही तुम्ही आहार घेत नाही तेव्हा तप होते. जेव्हा तप होते तेव्हा कर्म क्षय होतो. जुने पाप नष्ट होतात. आठ कर्मांची निर्जरा होते. यासाठीच जैन धर्मात तप साधनेला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. नकळत तप होते तेंव्हाही देवगती प्राप्त होते. समजून घेऊन तप केले तर मोक्षप्राप्ती होते. यासाठी पर्युषण काळात बियासणा तप केले पाहिजे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# गणेशोत्सवात 'डीजे बंद'चा नगर तालुका पोलिसांचा निर्धार

## डीजे वाजवल्यास मंडळासह चालकावर गुन्हा; डीजे जप्त करण्याचा इशारा

नगर – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगर तालुका पोलीस ठाण्यात गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करताना डीजेचा वापर पूर्णपणे टाळावा, असे आवाहन तालुका पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी केले. डीजे वाजवल्यास संबंधित गणेश मंडळ आणि डीजे चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल तसेच डीजे जप्त केला जाईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगर तालुका पोलीस ठाण्यात गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत सूचना देतांना स.पो.नि. गणेश वारुळे.

गणेशोत्सवात पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य देण्याचे आवाहन पोलिसांनी केले. गावागावात भजन, कीर्तन, व्याख्याने, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून गणेशोत्सव अधिक विधायक पद्धतीने साजरा करावा, असे स.पो.नि. वारुळे यांनी सांगितले.

नगर तालुक्यात ६९ गावे असून, प्रत्येक गावातील ग्रामस्थ, गणेश मंडळे, पदाधिकारी, ग्रामपंचायत प्रशासन आणि पोलिसांनी परस्पर सहकार्य करणे गरजेचे आहे. 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविण्यासाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा. ही संकल्पना प्रभावीपणे राबविणाऱ्या गावांना बक्षीस देण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

गावातील डीजे बंद करण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करताना वारुळे म्हणाले की, डीजेमुळे होणाऱ्या मोठ्या आवाजाचा परिणाम लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच विद्यार्थ्यांवर होतो. ध्वनी प्रदूषणामुळे आरोग्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात ध्वनी प्रदूषण टाळणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

गावात नियमांचे उल्लंघन करून डीजे वाजविला जात असल्यास नागरिकांनी तत्काळ नगर तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सव आनंदात, शांततेत आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत साजरा करण्याचे आवाहन पोलिसांनी केले.

# दिपांजली भालेराव यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

नगर – सेंट मोनिका अध्यापक विद्यालयातील प्राध्यापिका दिपांजली चंद्रशेखर भालेराव यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी अध्यापन विद्यार्थी घडविणे तसेच संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये दिलेल्या योगदाना बद्दल त्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात रेव्ह. अने व्ह. अनोश शिरसाठ पाळक यांच्या प्रार्थनेने झाली. सेंट मोनिका अध्यापिका विद्यालयातील अध्यापिकांनी ईशस्तवन, तर विद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविक प्रा. रिबेका चांदेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शिंदे यांनी करून दिला. डी. डी. सोनवणे पाळक यांनी उपस्थितांना संदेश दिला. यावेळी प्रा. शुभांगी कुंभार, प्रा. सुलक्षणा गायकवाड, प्राचार्या मनोरमा काठे, माजी प्राचार्य एस. एस. भिंगारदिवे, माजी प्राचार्या रत्नप्रभा काकडे, श्रद्धा पवार, अधिव्याख्याता दहिफळे तसेच डॉ. कमर सुरूर यांनी दिपा भालेराव यांच्यासोबत केलेल्या कार्याचे अनुभव मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या मनीषा पवार होत्या. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात दिपा भालेराव यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सूत्रसंचालन प्रा. रिबेका चांदेकर यांनी केले. आभार प्रा. विनोद चंदेल यांनी मानले.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे जपानी भाषेत यश; नेहा शिरसाठ, परम वैरागर उत्तीर्ण

नगर – विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान (बी. ई. आय.टी.) शाखेची विद्यार्थिनी नेहा शिरसाठ हिने जपानी भाषेतील प्रतिष्ठित जेएलपीटी–एन४ परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. तसेच, महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी परम वैरागर याने कठीण मानली जाणारी जेएलपीटी–एन३ परीक्षा उत्तीर्ण करत जपानी भाषा प्रावीण्यात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, परम वैरागर याची एक्सेंचर या नामांकित कंपनीमध्ये वार्षिक पाच लाखांच्या पॅकेजवर निवड झाली असून, तांत्रिक शिक्षणासोबत परदेशी भाषेचे ज्ञान करिअरसाठी किती उपयुक्त ठरू शकते, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.



जपान सरकारशी संलग्न संस्थांमार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित केली जाणारी जेएलपीटी परीक्षा जपानी भाषेतील ज्ञान व आकलनाचे प्रमाणित मूल्यमापन करणारी महत्त्वाची परीक्षा मानली जाती. जुलै २०२६ मध्ये पार पडलेल्या या परीक्षेत नेहा शिरसाठ हिने एन ४ तर परम वैरागर याने एन३ स्तरावर यश मिळवून महाविद्यालयाच्या जपानी भाषा शिक्षण उपक्रमाला विशेष गौरव प्राप्त करून दिला आहे. विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्यासोबतच जागतिक स्तरावरील रोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयात विशेष केंद्र कार्यरत आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना जपानी भाषेचे प्रशिक्षण, परीक्षेची तयारी आणि जपानमधील उच्च शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दोघांचेही अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे, प्राचार्य प्रा. डॉ. रवींद्र नवथर, जपानी भाषा केंद्राच्या समन्वयक प्रा. पूजा वैकर, प्रा. वैदेही मुळे, सर्व विभागप्रमुख आणि प्राध्यापकांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करा, पण अध्यक्षपदाचा सौदा नको

## ॲड.सुरेश लगड यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी, सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय देण्याची मागणी

नगर – अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात अध्यक्ष पदावरून चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी म्हणून यासाठी अनेक राजकीय नेत्यांकडून प्रयत्न सुरू असले तरी बिनविरोधाच्या नावाखाली पुन्हा घराणेशाहीला आणि मोजक्या राजकीय घराण्यांच्या वर्चस्वाला खत पाणी घालू नये, अशी स्पष्ट भूमिका जिल्ह्याचे जेष्ठ विधीज्ञ ॲड. सुरेश लगड यांनी मांडली आहे.

जिल्ह्यातील विविध सत्ता स्थानी अनेक वर्षापासून काही ठराविक राजकीय घराण्याचे वर्चस्व राहिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, विविध पदे आणि राजकीय सत्ता स्थानी यामध्ये त्याच घरातील व्यक्तींना सातत्याने संधी मिळत असल्याची भावना सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळे जिल्हा बँकेचे अध्यक्षपदी पुन्हा त्याच घराण्यामध्ये फिरू नये, अशी मागणी ॲड. लगड यांनी केली आहे

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यास आपला विरोध नसल्याचे स्पष्ट करताना ड लगड यांनी बिनविरोध निवडणूक ही सहकाराच्या हितासाठी असावी. परंतु ती एखाद्या व्यक्तीला किंवा राजकीय घराण्याला अध्यक्षपद देण्यासाठीची तडजोड ठरू नये. बँकेचे अध्यक्ष पदासाठी कोणाचे नाव पुढे येणार याची चर्चा सुरू झाली असतानाच घराणेशाहीचा मुद्दा ऐरणीवर आणला आहे. एखाद्या उमेदवाराच्या नावाला विरोध असेल तर त्या व्यक्तींनी मुळातच निवडणुक लढू नये आणि यदाकदाचित निवडणूक लढणार असेल तर अध्यक्ष पदाची मागणी करू नये, अशी भूमिका ॲड. सुरेश लगड यांनी मांडली. वास्तविक पाहता बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्व घटकांनी सामंजस्याची भूमिका घ्यावी. मात्र त्या सामंजस्याचा फायदा घेऊन आधीच सत्तेची अनेक पदे भूषवणाऱ्या राजकीय घराण्यांनाच पुन्हा महत्वाचे पद देणे योग्य ठरणार नाही, असे ॲड. लगड यांनी स्पष्ट केले

वर्षानुवर्षे पक्षासाठी आणि सहकार क्षेत्रासाठी काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार? हा खरा प्रश्न आहे ज्यांच्या घरातील एक व्यक्ती पदावर, दुसरी सत्ता केंद्रात आणि तिसरी राजकारणात सक्रिय अशा पद्धतीने सत्तेची पदे घरातच फिरत राहिली तर सामान्य कार्यकर्ता शेवटी केवळ झेंडे आणि खुर्च्या लावण्यासाठी उरणार का? असा सवाल ॲड. सुरेश लगड यांनी उपस्थित केला आहे. राजकारणात नव्या नेतृत्वाला संधी मिळणे आवश्यक आहे एखाद्या सामान्य कार्यकर्त्याने अनेक वर्ष पक्षाचे, सहकाराचे आणि समाजाचे काम केले असेल तर त्यालाही नेतृत्वाची संधी मिळाली पाहिजे, घराण्याच्या नावावर नव्हे तर कार्यकर्त्याच्या कामाच्या बळावर पद मिळाले पाहिजे, अशी अपेक्षाही ॲड. लगड यांनी व्यक्त केली आहे

तेव्हा जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री पुढाकार घेत असतील तर त्यांनी घराणेशाहीला प्रोत्साहन न देता सर्वसामान्य कार्यकर्ते पदाधिकारी आणि सहकार क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारी व्यक्तींना न्याय मिळेल अशी भूमिका घ्यावी अशी मागणी ॲड. लगड यांनी शेवटी केली आहे. जिल्हा बँक ही केवळ राजकीय सत्ता मिळण्याचे केंद्र नसून शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडलेली महत्त्वाची संस्था आहे. त्यामुळे तिचे नेतृत्वही व्यापक सहकार क्षेत्राचा विचार करणारे आणि सर्व घटकांना सोबत घेणारे असावे, असेही ॲड. सुरेश लगड यांनी मुख्यमंत्री महोदय यांना केलेल्या मागणीत म्हटले आहे. घराणेशाही असलेल्या राजकीय कुटुंबातील मुलांनी केवळ घराण्याच्या बळावर पुन्हा सत्ता केंद्र बनण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरू नये सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आणि पदे पदाधिकाऱ्यांना न्याय दिला तरच नव्या नेतृत्वाला संधी मिळेल आणि जिल्ह्याच्या राजकारणात परिवर्तन घडेल असा स्पष्ट संदेश ॲड. सुरेश लगड यांनी दिला आहे. सबब जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी पण घराणेशाहीच्या किंमतीवर नको, अशी मागणी ॲड. लगड यांनी मुख्य मंत्री यांचेकडे केली आहे

# ग्रामपंचायतींमध्ये ५८ लाख कुणबी नोंदी प्रसिद्ध करणार

## १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे – मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख नोंदी ग्राम पंचायतींमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार असून, १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करावीत; तसेच सर्व जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवून आरक्षणातील प्रत्येक प्रश्नाबाबत गांभीर्याने कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.



मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, शिंभणी, हिंगोली, लातूर, जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्याशी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेऊन झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये मंत्री विखे पाटील यांनी जिल्हानिहाय देण्यात आलेली जात पडताळणी प्रमाणपत्रांची संख्या, कुणबी नोंदी तसेच प्राप्त झालेल्या अर्जांचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये सादर केली. यामध्ये प्रामुख्याने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सापडलेल्या नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत. त्याच पद्धतीने इतर जिल्ह्यांनीही अशाच प्रकारची कार्यवाही करावी आणि १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रमाणपत्रांच्या पूर्ततेसाठी शिबिरे आयोजित करून अधिक चांगल्या पद्धतीचे नियोजन करावे, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीमध्ये दिल्या.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे दिली जातील. मराठवाड्यात आतापर्यंत साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचे सांगत, पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देताना नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील समाजासाठी आंदोलन करीत असून, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सरकार त्यांच्याशी चर्चा करणारच आहे. काही लोकांना त्या पायघड्या वाटत असतील, पण हे सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकार पुढाकार घेत आहे; परंतु काही लोक मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी मुद्दाम आंदोलनाची भाषा करीत असतील तर ते चुकीचे असून, याद्वारे विनाकारण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारने काहीही चुकीचे केलेले नाही व तशी भूमिकाही नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर चौकटीत आणि सर्व समाजांच्या हिताचा विचार करून सोडविण्याची सरकारची भूमिका असून, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्याचे विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

मराठा आरक्षणाबाबत सरकार केवळ आश्वासने देत असल्याच्या मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपावर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, मागील आंदोलनातील बहुतांश मागण्यांवर सरकारने कार्यवाही केली असून, उर्वरित मागण्यांवरही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका असून, आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्याची सरकारची कधीही तयारी आहे.



के. जी. महाविद्यालयात आविष्कार स्पर्धेची कार्यशाळा पार पडली.

# के. जी. महाविद्यालयात आविष्कार स्पर्धेची कार्यशाळा संपन्न

नगर – के. जी. महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, सर्जनशीलता व नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी आविष्कार स्पर्धेच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आविष्कार कार्यशाळा या कार्यक्रमास महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत तसेच परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी कार्यशाळेत आविष्कार स्पर्धेचे स्वरूप, संशोधन प्रकल्पाची निवड, संशोधन पद्धती, प्रकल्प मांडणी, नावीन्यपूर्ण संकल्पना तसेच प्रकल्पाचे सादरीकरण याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा. स्नेहल बोरोवके यांनी संशोधनाचे महत्व आणि आविष्कार स्पर्धेतील सहभागाचे फायदे समजावून सांगितले. आविष्कार समन्वयक डॉ. वर्षा कीर्तने यांनी प्रस्ताविकात संशोधन कार्यशाळेच्या आयोजना मागील उद्देश स्पष्ट केला. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांचे निरसन करून त्यांना आवश्यक सूचना दिल्या. प्रा. योगेश चकोते यांनी आभार मानले.

यावेळी प्रा. रोहिणी क्षीरसागर तसेच हर्षाली रासकर यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

